महाराष्ट्र शासन

आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांचे कार्यालय.

वाचले :- १) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक डिएनएस १६८६/तीन दिनांक २८.७.१९८७

२) क्रमांक डीपीएस १६८८/२९४/तीन दिनांक [illegible]

३) क्रमांक डीपीएस ११९४/५३६९४/दोन दक्षता/चार दिनांक ६.२.१९९६.

## परिपत्रक

क्रमांक डीएनएस ११९८/४३/चार                                   मुंबई, ३ डिसेंबर ९८

या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक डिएनएस १६८६/तीन दिनांक २८.७.८७ नुसार विशेष विप्रकृत पदार्थांचे टँकरमध्ये विप्रकृतीकरण केल्यानंतर टँकरच्या प्रत्येक कप्प्यातून नमुने काढण्याबाबत सूचना निर्गमित केलेल्या आहेत. परंतु सदर नमुने विश्लेषणासाठी प्रयोगशाळेकडे पाठविण्यात येत नाहीत. त्यामुळे नमुने काढण्याचा उद्देश सफल होत नाही. तसेच नमुन्यांची तपासणी होत नसल्याने डिनेचरंटस न मिसळण्याच्या गैरप्रकारास वाव मिळू शकतो. सदर गैरप्रकार टाळण्यासाठी यापुढे टँकरमध्ये विशेष विप्रकृतीकरण करण्याबाबत व नमुने घेण्याबाबत खालीलप्रमाणे पध्दत विहीत करण्यात येत आहे.

२. प्रथम टँकरमध्ये प्रत्येक कप्प्यात एकूण क्षमतेच्या सुमारे ५० टक्के म्हणजेच कप्प्याची क्षमता प्रत्येकी ४००० लिटर्स असल्यास प्रत्येक कप्प्यात सुमारे २००० लिटर पदार्थ भरण्यात यावे. त्यानंतर संबंधीत औद्योगिक वापरास विहीत असलेले डिनेचरंट, बिटरंट व रंग विहीत प्रमाणात प्रत्येक कप्प्यात मिसळावेत. त्यानंतर प्रत्येक कप्प्यात क्षमतेनुसार उर्वरीत पदार्थ भरण्यात यावे. आवश्यकतेनुसार प्रत्येक कप्प्यातील विप्रकृत पदार्थ ढवळण्यात यावे व त्यानंतर प्रत्येक कप्प्यातून सुमारे ३७५ मि.ली. ~~म्हणजे~~ ४ नमुना घेण्यात यावा. ते सर्व नमुने एकत्र मिसळून त्याचे विभाजन ३७५ मि.ली.च्या ४ बाटल्यामध्ये करावे. नमुना बाटल्यांच्या लेबलवर टाकचे नाव, डिनेचरंटचे नाव व प्रमाण, बिटरंट, कलर यांचे प्रमाण यांचा स्पष्ट उल्लेख असावा. नमुने योग्य प्रकारे सील करावेत. नमुन्याच्या ४ पैकी दोन बाटल्या वाहन चालकाकडे देऊन त्याची पोच घेण्यात यावी. उर्वरीत दोन बाटल्यांपैकी १ बाटली आयातदार अनुज्ञप्तीधारकाकडे सोपवावी. दुसरी बाटली आसवनीच्या प्रभारी अधिकारी यांनी त्यांच्याकडे सुरक्षित ठेवावी.

ज्या डिएस-५ अनुज्ञप्तीधारकाकडे डिनेचरंट तपासणीची सोय आहे त्या अनुज्ञप्तीधारकाने त्यांचे अनुज्ञप्तीच्या जागेत टँकर पोहचताच टँकर

..२..पर

सोबतच्या दोन नमुन्यापैकी एका नमुन्याचे विश्लेषण करावे व डिनेचरंटचे प्रमाण किंवा पदार्थाची तीव्रता यामध्ये तफावत आढळल्यास त्याची माहिती क्षेत्राच्या राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांना व जिल्हा अधीक्षकांना द्यावी. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षकाने ज्या आसवनीमधून पदार्थाचे वितरण केले गेले त्या आसवनीशी थेट संपर्क साधून आसवनीच्या प्रतिनिधीस डिएस-५ अनुज्ञप्तीच्या ठिकाणी बोलावून घेऊन व दुसऱ्या बंद नमुन्याचे पृथ:करण सदर प्रतिनिधी समक्ष व राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांच्या समक्ष करावे. जर नमुन्यात व टँकरमधील पदार्थात तफावत आढळल्यास टँक व त्यामधील पदार्थ जप्त करून कार्यवाही करावी. टँकरमधील पदार्थ नमुन्यातील पदार्था- प्रमाणे असल्यास डिएस-५ घटकाने पदार्थ उतरून घ्यावे व उर्वरित नमुना संचालक, हाफकीन इंस्टिट्यूट, परेल किंवा राज्य उत्पादन शुल्क प्रयोगशाळा, जुनाभट्टी, सायन, मुंबई-२२ येथे पाठवावा.

४. अधीक्षक, उप अधीक्षक तसेच उप आयुक्त राज्य उत्पादन शुल्क हे ज्यावेळेस आसवनीस भेट देतील त्यावेळेस त्यांनी घेतलेल्या नमुन्यांपैकी कोणतेही १० टक्के नमुने निवडून ते पृथ:करणासाठी वरील परिच्छेदातील प्रयोगशाळेकडे पाठवावेत व त्यांचे पृथ:करण शुल्क आसवनीकडून वसूल करण्यात यावे.

५. आसवनीकडे जमा असलेले नमुने पदार्थात डिनेचरंट मिसळल्याची प्रयोगशाळेकडून खात्री होईपर्यंत किंवा नमुना घेतल्याच्या तारखेपासून सहा महिने यापैकी जे आधी होईल तोपर्यंत नमुने सुरक्षित ठेवावेत.

६. ज्या डिएस-५ अनुज्ञप्तीधारकाकडे डिनेचरंट तपासण्याची व्यवस्था नाही त्यांनी हाफकीन इंस्टिट्यूट, परेल, किंवा राज्य उत्पादन शुल्क, प्रयोग- शाळा जुनाभट्टी, सायन, मुंबई-२२ येथे नमुने तपासणीसाठी पाठवावेत.

७. कार्यकारी अधिकाऱ्यांनी डिएस-५ घटकांना अचानक भेटी देऊन त्यावेळी टँकरमधील पदार्थ उतरून घेताना नमुने घ्यावेत व भेटीच्या वेळी टँकर आला नसल्यास साठवणूक टाकीतून नमुने घ्यावेत. अधीक्षकांनी कार्यकारी अधिकाऱ्यांना व भरारी पथकाच्या अधिकाऱ्यांना कार्यक्षेत्रातील अनुज्ञप्त्यांची संख्या व अधिकाऱ्यांच्या भेटींच्या नोंदी विचारात घेऊन दरमहा किती नमुने घ्यावेत हे निश्चित करावे.

८. नमुन्यातील विश्लेषणामध्ये तफावत आढळल्यास चौकशी डीएस-५ अनुज्ञप्ती असलेल्या जिल्ह्याच्या अधीक्षकांनी पूर्ण करून कारण/जबाबदार निश्चित करून सविस्तर अहवाल पाठवून कार्यवाहीचे आदेश प्राप्त करावेत.

..३..पर

९. प्रयोगशाळा ठिकाणी पाठवावयाचे नमुन्याचे फीचे बाबतीत परिपत्रक क्रमांक बीपीएल/आर(एक) दिनांक ४.९.१९९७ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत त्या लागू राहतील.

वरील सूचनांची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

सही/-
(अजितकुमार जैन)
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

उद्धृत प्रत-

तात्काळ

=======

00000

क्रमांक: लिएनएस ११३८/ ११२९६ / अहमदनगर, दिनांक १०-१२-९८

१. प्रत:- प्रभारी अधिकारी मेसर्स डॉ. विखे पाटील स.सा. कारखाना, प्रवरानगर ता. श्रीरामपुर
यांना माहिती व तातडीने कार्यवाहीसाठी अग्रेषित.
२. त्यांनी, मा. आयुक्तांच्या उपरोक्त परिपत्रकातील सूचनांनुसार तात्काळ अंमलबजावणी करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी या कार्यालयास सादर करावा. मा. आयुक्तांच्या परिपत्रकातील सूचनानुसार त्यांनी कार्यवाही पार पाडली नसल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करणे क्रमप्राप्त होईल याची नोंद घ्यावी. पोच द्यावी

२. प्रत:- निरीक्षक / मुख्य निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क ----------
यांना माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.
२. त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील आपल्या सर्व डि.एस.-५ अनुज्ञप्तीधारकांना अचानक भेटी देऊन टँकरमधील मद्यार्क उतरुन घेतांना नमुने घ्यावेत व भेटीच्या वेळी टँकर आला नसल्यास, साठवणूक टाकीतील नमुने घ्यावेत. आसवणीतील नमुन्यात व डि.एस.-५ घटकातील नमुन्यात काही तफावत आढळून आल्यास सविस्तर चौकशीचा अहवाल या कार्यालयाकडे वेळोवेळी सादर करीत जावा. त्यांनी दरमहा किती नमुने घ्यावेत, याबाबत कामाचा बोजा लक्षात घेऊन निर्णय घेण्यात येत आहे. कृपया उपरोक्त परिपत्रकातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

(ना. ई. [illegible])
अधीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क, अहमदनगर